पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था संचलित

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

## अर्थशास्त्र विभाग

## वार्षिक अहवाल: 2022 – 2023

पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था संचलित

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

## अर्थशास्त्र विभाग वार्षिक अहवाल

## 2022 – 2023

### I. एकूण विद्यार्थी संख्या (Total Student Strength):

| Sr. | Year | BAFY | BASY | BATY |
|---|---|---|---|---|
| 1 | 2022-23 | 38 | 19 | 12 |

### II. विद्यार्थ्यांमधील मुला व मुलींची संख्या ( Gender Wise students Strength: 2022-23)

| Class | Male | Female | Total |
|---|---|---|---|
| BAFY | 17 | 21 | 38 |
| BASY | 9 | 10 | 19 |
| BATY | 5 | 7 | 12 |
| MAIN (BATY) | 2 | 1 | 03 |



## विविध वर्गांच्या व व्हॉट्सॲप ग्रुपची निर्मिती (WhatApp Groups of Various Calss ):

विद्यार्थ्यांना विषयाशी संबंधित विविध बाबींची माहिती देण्याच्या दृष्टीने, बी.ए .प्रथम वर्ष, द्वितीय वर्ष व तृत्तीय वर्ष या तीन वर्गांचे तीन व्हॉट्सॲप ग्रुप तयार करण्यात आले. या ग्रुपवर विद्यार्थ्यांना विविध शैक्षणिक उपक्रमांच्या बाबतीमध्ये तसेच परीक्षेच्या बाबतीमध्ये माहिती पाठवण्यात आली. या ग्रुपवर विषयाशी संबंधित विविध व्हिडिओच्या लिंक व शैक्षणिक माहितीच्या व्हिडिओच्या लिंक पाठवण्यात आल्या. तसेच सराव चाचण्यांच्या लिंक पाठवण्यात आल्या.










**व्हॉट्सॲप ग्रुपचे फोटो. (WhatsApp group photos)**

## पंडित दीनदयाळ जयंती:

25 सप्टेंबर 2022 रोजी विभागाच्यावतीने महाविद्यालयामध्ये पंडित दीनदयाळ उपाध्याय जयंती साजरी करण्यात आली. पंडित दीनदयाळ यांच्या जीवन व कार्याची सर्वांना माहिती व्हावी यासाठी, पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या जीवन व कार्यावर व्हिडिओ तयार करून तो युट्युबवर टाकण्यात आला. त्याची लिंक खाली देण्यात आली आहे.

**पंडित दीनदयाळ उपाध्याय : संक्षिप्त जीवन परिचय**

https://www.youtube.com/watch?v=zBBnEHz3uVY&t=3s

# अतिथी व्याख्याने (Guest Lecturers):

## प्रथम सत्रातील अतिथी व्याख्याने:

### 1) प्रथम सत्रातील पहिले अतिथी व्याख्यान (First Guest Lecturer in First Term):

अर्थशास्त्र विभागाच्यावतीने दिनांक 18 ऑक्टोबर 2022 रोजी डॉ. धैर्यशील साळुंके (विभाग प्रमुख,अर्थशास्त्र विभाग, विवेकानंद महाविद्यालय,औरंगाबाद) यांच्या व्याख्यानाचे आयोजन केले गेले. त्यांनी **राष्ट्रीय उत्पन्न (National Income)** या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे दिली .

**आयोजनाचे स्वरूप : ऑनलाईन.** त्यासाठी गुगल मीट (Google Meet) ॲपचा वापर केला गेला. या कार्यक्रमास एकूण 12 जणांची उपस्थिती होती, त्यापैकी दहा विद्यार्थी होते.




**दिनांक 18 ऑक्टोबर 2022 रोजी राष्ट्रीय उत्पन्न या विषयावर मार्गदर्शन करताना डॉ. धैर्यशील साळुंके.**

**Dr. Dhairshil Salunke delivering Guest Lecture on 'National Income' on 18th October 2022**




**दिनांक 18 ऑक्टोबर 2022 रोजी राष्ट्रीय उत्पन्न या विषयावर मार्गदर्शन करताना डॉ. धैर्यशील साळुंके.**
**Dr. Dhairshil Salunke delivering Guest Lecture on 'National Income' on 18th October 2022**

## 2) प्रथम सत्रातील : दुसरे अतिथी व्याख्यान (Second Guest Lecturer In First Term):

श्री पवार सर (उच्च माध्यमिक व माध्यमिक विद्यालय, जिल्हा परिषद, फुलंब्री) यांनी दिनांक 21 /11/2022 रोजी राष्ट्रीय उत्पन्न मापनाच्या पद्धती (Methods of National Income Measurement) या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास एकूण 20 विद्यार्थी उपस्थित होते.




**दिनांक 21 /11/2022 रोजी राष्ट्रीय उत्पन्न मापनाच्या पद्धती  या विषयावर अतिथी व्याख्यान देताना श्री पवार सर**

**Shri Pawar sir delivering Guest Lecture on Methods  National Income Measurement on 21st Nov. 2022**



3) **द्वितीय सत्रातीलअतिथी  व्याख्यान ( Guest Lecturer In Second Term):** दिनांक 16 मार्च 2023 रोजी बाजार प्रकार (Types of   Market)  या विषयावर प्रा. डॉ. विकास सुकाळे (अर्थशास्त्र विभाग, महाविद्यालय ,नांदेड)यांनी अतिथी व्याख्यान दिले., यावेळी 19 विद्यार्थी उपस्थित होते .




**दिनांक 16 मार्च 2023 रोजी बाजार प्रकार या विषयावर मार्गदर्शन करताना डॉ विकास सुकाळे.**

**Dr. Vikas Sukale delivering Guest Lecture on Types of Market on 16th March 2023**





**दिनांक 16 मार्च 2023 रोजी अतिथी व्याख्यानास उपस्थित विद्यार्थी.**

**Students presented for the Guest Lecture on 16th March 2023.**

## भित्तीपत्रकाचे प्रकाशन (Wal Poster Publication):

दिनांक 15 ऑक्टोबर 2022 रोजी अर्थशास्त्र विभागाच्यावतीने **'भारतातील अन्नधान्य उत्पादनाची प्रवृत्ती'** (Trends In Agricultural Production of India )या विषयावर भित्तीपत्रक तयार करण्यात आले. यामध्ये कु. उर्मिला ढोके, कु. पूनम दाभाडे , कु. दुर्गा बनसोडे, कु. अश्विनी खटे इत्यादी विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. भितीपत्रकाचे विमोचन डॉ. व्यंकटेश लांब व प्राचार्य डॉ. एस. आर. टकले यांच्या हस्ते करण्यात आले.



**दिनांक 16 नोव्हेंबर 2022 रोजी भितीपत्रकाचे वीमोचन करताना डॉ. व्यंकटेश लांब व प्राचार्य.**

**Dr. Venkatesh Lamb and Principal are publishing Wall Poster on 16 November 2022.**

## ऑनलाईन सराव चाचण्यांचे आयोजन:

विद्यार्थ्यांना त्यांच्या स्वतःच्या विषयाचे विषयज्ञान तपासून पाहता यावे व त्यामध्ये सुधारणा करता यावी. या उद्देशाने गुगल फॉर्मच्या सहाय्याने Google Quizzes ची निर्मिती करून विद्यार्थ्यांच्या विविध पेपरच्या ऑनलाईन सराव चाचण्या घेण्यात आल्या. या सराव चाचण्यांच्या लिंक, विद्यार्थ्यांना सराव करण्यासाठी त्यांच्या ग्रुपवर पाठवण्यात आल्या. या शैक्षणिक वर्षात अर्थशास्त्र विभागाच्या वतीने घेण्यात आलेल्या ऑनलाईन सराव चाचण्याच्या लिंक पुढीलप्रमाणे.

| अ. क्र. | ऑनलाईन सराव चाचण्याच्या | चाचण्यांच्या लिंक |
|---|---|---|
| 01 | सूक्ष्म अर्थशास्त्र ( Micro Economics) : सराव चाचणी 2022-2023 | https://forms.gle/8upKX1gi8mT282gV7 |
| 02 | Macro Economics BAFY प्रश्न मंजुषा: क्रमांक : 01 2022-23 | https://forms.gle/HfoZfRENkEnKZVsA9 |
| 03 | स्थूल अर्थशास्त्र सराव चाचणी : 2022 -2023 | https://forms.gle/wk5PEa5VkLhyeWvk7 |
| 04 | 2022-2023, स्थूल अर्थशास्त्र सराव चाचणी क्रमांक: II | https://forms.gle/sF8f2tn4qtJQiup29 |



**गुगल फॉर्मच्या सहाय्याने तयार केलेल्या विविध Google Quizzes**

### विद्यार्थ्यांचा सेमिनार:

दिनांक 23मार्च 2023 रोजी अर्थशास्त्र विभागाच्या वतीने महाराष्ट्राचा अर्थसंकल्प 2023-2024 या विषयावर विद्यार्थ्यांच्या सेमिनारचे आयोजन आयोजन केले गेले. यामध्ये विविध विद्यार्थ्यांनी महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पाविषयी आपली मते मांडली. यामध्ये कु.आरती प्रधान , कु. दुर्गा बनसोडे, कु पूनम दाभाडे इत्यादी विद्यार्थ्यांनी आपली मते मांडली. या कार्यक्रमास एकूण 09 विद्यार्थी उपस्थित होते.





**महाराष्ट्राचा अर्थसंकल्प 2023- 2024 या विषयावर बोलताना विद्यार्थी**

**Students Delivering Seminar on Maharashtra Budget 2023-2024**

### प्रमाणपत्र अभ्यासक्रम कृषी प्रक्रिया आणि साठवणूक:

**Certificate Course on Agriculture Product Process and Storage:** अर्थशास्त्र विभागाने 2023- 24 या शैक्षणिक वर्षांमध्ये Agriculture Product Process and Storage हा प्रमाणपत्र अभ्यासक्रम चालवला या अभ्यासक्रमास एकूण 12 विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता.

### क्षेत्र पाहणी Field Survey :

शैक्षणिक वर्ष 2022-2023 मध्ये अर्थशास्त्र विभागाचे प्रा. डॉ. पी. एम. कल्याणकर यांना Indian Council of Social Science Research कडून मिळालेल्या Topic of the Research Project: **“Impact of Covid-19 Epidemic on Tourism Economy: With Special Reference to Ajanta and Ellora Caves World Heritage Monuments”.** या लघु संशोधन प्रकल्पा अंतर्गत वेरूळ आणि अजिंठा या जागतिक पर्यटन स्थळावर अवलंबून असणाऱ्या विविध घटकांकडून अनुसूचीच्या माध्यमातून माहिती संकलित करण्यात आली. त्यामध्ये एकूण 80 प्रश्नावाल्या भरून घेण्यात आल्या. या क्षेत्र पाहणी मध्ये 3 संशोधक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.







**वरूळ येथे क्षेत्र पाहणी करतांना संशोधक विद्यार्थी**

**Research Students during a field visit at Ellora Caves**

## सामजस्य कराराअंतर्गत कार्यक्रम:

## Programme Under MOU (Dept. Of Eco., Dr.B.A.M.U.):

अर्थशास्त्र विभाग, श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री व अर्थशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांच्यात झालेल्या सामंजस्य कराराअंतर्गत महाराष्ट्राचा अर्थसंकल्प 2023 -2024 “ या विषयावर डॉ. पुरुषोत्तम देशमुख यांच्या व्याख्यानाचे दिनांक 20 मार्च 2023 आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. एस.आर. टकले होते.

‘महाराष्ट्राचा अर्थसंकल्प 2023- 2024’ या विषयावर बोलताना डॉ. पुरुषोत्तम देशमुख म्हणाले की, लेक लाडकी ही योजना सामाजिक विकासाचा क्रांतीमार्ग ठरणार आहे. महाराष्ट्र शासनाने 2023-24 यावर वर्षाचा अर्थसंकल्पात नव्या स्वरूपात जाहीर केलेल्या लेक लाडकी योजनेत पिवळे व केशरी रेशन कार्ड धारक कुटुंबात मुलीच्या जन्मानंतर पाच हजार रुपये, पहिलीत असताना चार हजार रुपये, साहावीत सहा हजार रुपये, अकरावीत आठ हजार रुपये आणि अठरा वर्षाची झाल्यानंतर 75 हजार रुपये मिळणार आहेत. या योजनेमुळे महिला सबलीकरणास चालना मिळणार आहे. यामुळे मुलींच्या जन्माचे स्वागत होईल, मुलींचे शैक्षणिक गळतीचे प्रमाण कमी होईल तसेच तिच्या लग्नाच्या वेळेस तिच्या आई-

वडिलांना आर्थिक मदत सुद्धा होईल. ही योजना एकाच वेळेस अनेक उद्देशांना साध्य करणारी असल्यामुळे ही योजना सामाजिक विकासाचा क्रांतीमार्ग ठरणार आहे,असे मत त्यांनी व्यक्त केले.

या अर्थसंकल्पात महिलांना बस प्रवासात 50 टक्के सवलत, अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या मानधनात वाढ, महिलांचे पन्नास हजार रुपयांचे उत्पन्न व्यवसाय करातून सूट अशा प्रकारे अनेक योजनांच्या माध्यमातून महिलांच्या सबलीकरणासाठी अनेक पावले उचलण्यात आलेली आहेत. या अर्थसंकल्पातून शाश्वत शेती व समृद्ध शेतकरी, सर्व समावेशक विकास, पायाभूत सुविधांचा विकास, रोजगार निर्मिती, पर्यावरण पूरक विकास या अशा प्रकारे पंचामृत तत्त्वावर भर देण्यात आलेला आहे,असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. पी. एम कल्याणकर यांनी केले, पाहुण्यांचा परिचय डॉ महेश थोरात यांनी करून दिला कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. ऋतुजा अंभोरे ने केले तर प्रार्थना कु. आरती केजभट, कल्याणी नाईक व उर्मिला ढोके यांनी म्हटली, तर आभार कु. पुनम दाभाडे या विद्यार्थिनीने मानले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व 37 विद्यार्थी उपस्थित होते.




दिनांक 20 मार्च 2023 रोजी, महाराष्ट्राचा अर्थसंकल्प: 2023- 24 या विषयावर बोलताना डॉ. प्रा. पुरुषोत्तम देशमुख

**The Prof. Dr. Purushottam Deshmukh delivering lecture on 'Maharashtra Budget 2023-24' on 20th March 2023**



दिनांक 20 मार्च 2023 रोजी, महाराष्ट्राचा अर्थसंकल्प: 2023- 24 या विषयावर बोलताना डॉ. प्रा. पुरुषोत्तम देशमुख

**The Prof. Dr. Purushottam Deshmukh delivering lecture on 'Maharashtra Budget 2023-24' on 20th March 2023**



दिनांक 20 मार्च 2023 रोजी महाराष्ट्राचा अर्थसंकल्प 2023 24 या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य, डॉ.एस. आर. टकले

**Principal Dr. S.R. Takle giving the presidential remark of the program on 'Maharashtra Budget 2023-24'.**



**महाराष्ट्राचा अर्थसंकल्प 2023 24 या कार्यक्रमास लाभलेला विद्यार्थ्यांचा प्रतिसाद.**

**Student present for the program of Maharashtra Budget 2023-2024**

PRINCIPAL
Shri Sant Savta Mali Gramin Mahavidyalaya,
Phulambri. Ta. Phulambri, Dist. Aurangabad

| | |
|---|---|
| | **विभाग प्रमुख** |
| प्राध्यापक, डॉ. पी.एम. कल्याणकर | प्राचार्य, डॉ. एस. आर. टकले |